**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय निवृत्ती पाटील
रा. बाजारपेठ, दत्तमंदिराजवळ,
मु.पो. काले, ता.कराड, जि.सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलीस अधिक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
डी.वाय.एस.पी. कार्यालय, एस.टी. स्टँड जवळ कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१९ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. विजय निवृत्ती पाटील
रा. बाजारपेठ, दत्तमंदिराजवळ, मु.पो. काले, ता.कराड, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
कराड, भाग कराड, एस.टी. स्टँड जवळ कराड, जि.सातारा श्री.वि.शं.दळवी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र अ) ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कराड पोलीस ठाण्यात आपण दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड भाग, कराड, जि.सातारा यांनी दिली नाही. दुय्यम निबंधक कार्यालय, कराड येथे तयार केलेल्या दस्तामध्ये खाडाखोड करून खोटा दस्त केल्याबद्दल आपण फिर्याद दिली होती. पोलिसांनी त्या संदर्भात जाबजबाब घेतले. परंतु त्याबाबतची कोणतीही माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विजय निवृत्ती पाटील यांनी केले.

संबंधित प्रकरण सांगली जिल्ह्यातील आहे. त्यामुळे श्री.पाटील यांचा अर्ज पोलीस अधीक्षक, सांगली यांच्याकडे पाठविण्यात आला. तसे श्री.पाटील याना विहित मुदतीत कळविले आहे. तसेच संबंधित प्रकरणातील आपल्याकडील माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड भाग, कराड, जि.सातारा श्री.वि.शं.दळवी यांनी केले. मूळ अर्जानुसार जन माहिती धिकाऱ्यांनी उत्तर दिले असले, तरी त्याच्या पुराव्यादाखल, श्री.पाटील यांचा तक्रारअर्ज पोलीस अधीक्षक, सांगली यांच्याकडे पाठविल्याच्या पत्राची प्रत अपीलकर्ता याना तीन दिवसांत द्यावी. तसेच संबंधित कागदपत्रे पोलीस अधीक्षक, सांगली यांच्याकडे पाठविल्याचा जावक क्रमांक, दिनांक आदी तपशील द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

श्री.पाटील यांचा तक्रार अर्ज पोलीस अधीक्षक, सांगली यांना पाठविण्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड भाग, कराड यांनी पोलीस अधीक्षक, सातारा यांना पाठविलेल्या पत्राची छायांकित प्रत श्री.पाटील यांना पाठविल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड भाग, कराड, जि.सातारा श्री.वि.शं.दळवी यांनी दि.२३.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. तथापि संबंधित प्रकरण सर्व कागदपत्रांसह पोलीस अधीक्षक, सांगली

यांच्याकडे पाठविल्याचा कोणताही पुरावा त्यात दिलेला नाही. त्याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास त्वरित दिल्या जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता यांची तक्रार पोलीस अधीक्षक, सांगली यांच्याकडे पाठविल्याच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास पुरवून जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कराड भाग, कराड, जि.सातारा यांनी दि.२५.३.२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१५.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. प्रमोद पोपटलाल पेटकर
मु.पो. केम, ता.करमाळा,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक महाप्रबंधक,**
बँक ऑफ महाराष्ट्र,
विभागीय कार्यालय, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा शाखा प्रबंधक,**
बँक ऑफ महाराष्ट्र,
शाखा केम, ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३१/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/४/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०/५/२००८ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** बँक ऑफ महाराष्ट्र शाखा केम, ता. करमाळा मार्फत दि. १/४/२००७ पासून करण्यात आलेल्या कर्जव्यवहारांबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. प्रमोद पोपटलाल पेटकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील केले आहे, ते सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रिय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्याने अपिलावर कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संतोष अंकुशराव शेलार
२७/५,मुरारजी पेठ, निराले वस्ती,
गौरा नगर, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (म.),**
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रभारी आरोग्य अधिकारी,**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३७+१०३८/सोलापूर |
| २ | **माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही.** | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. संतोष अंकुशराव शेलार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेली निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे / जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 23 MAR 2010

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिल सुखदेव काटे
मु.पो.चिणके, ता. सांगोला,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,**
सांगोला तालुका सहकारी साखर कारखाना लि.
वाकी शिवणे, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९/५/२००८ |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>सांगोला तालुका सहकारी साखर कारखान्याच्या उभारणी संदर्भातील विस्तृत माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुनिल सुखदेव काटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. तसेच अपिलासोबत जन माहिती अधिका-याने दिलेले उत्तर आदि कोणतीही पूरक कागदपत्रे त्यांनी अद्याप सादर केलेली नाहीत. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 30 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुनील सुखदेव काटे
मु.पो. चिणके, ता. सांगोला,
जि. सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मॅनेजर** **उत्तरवादी**
पंतगरावजी क्रेडिट को-ऑप.सोसायटी,
सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९/५/२००८ |
| ३ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी:-**<br>पतंगरावजी क्रेडिट को-ऑप.सोसायटीच्या ठेवी, कर्जव्यवहार इ. च्या अनुषंगाने एकूण ९ मुद्दे | |

## <u>विवेचन</u>

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ प्रकरणी नागरी सहकारी पतसंस्थाना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय दिलेला आहे. सबब अपीलकर्ता श्री. सुनिल सुखदेव काटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 23 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भास्कर नामदेवराव घोलप
मु.पो.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी(उ.श्रे.),
पंचायत समिती आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पशुधन विकास अधिकारी विस्तार,
पंचायत समिती आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भास्कर नामदेवराव घोलप
मु.पो.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी(उ.श्रे.),
पंचायत समिती आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.राहुल काळभोर

**जन माहिती अधिकारी** तथा पशुधन विकास अधिकारी विस्तार,
पंचायत समिती आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे
विद्यमान-डॉ.के.के.कोहिनकर, तत्कालीन-डॉ.बी.एस.घंगाळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.३.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.४.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.४.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२.६.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.२.२०१० रोजी घेण्यात आली.

बर्ड फ्ल्यू रोगाने झालेल्या पोल्ट्रीधारकांच्या नुकसानभरपाई संदर्भात आपण मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी विस्तार, पंचायत समिती आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे यांनी काहीही कळविले नाही, म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे यांच्याकडे अपील केले. अभिलेखाचे अवलोकन करून माहिती घ्यावी, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला तोंडी सांगितले होते. प्रथम अपील केल्यानंतर आधीची तारीख टाकून शुल्काबाबतचे पत्र दिले. माहिती संकलित करावी लागेल, असे सांगण्यात येत असले तरी माहिती तयार असताना संकलित करण्याचा प्रश्न येत नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.भास्कर नामदेवराव घोलप यांनी केले.

श्री.घोलप यांनी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची होती. २५४ पोल्ट्रीधारक असून प्रत्येकी सुमारे १०० पानांची माहिती आहे. वित्तीय वर्षाअखेरीचे कामकाज व पशुसंवर्धन विभागातील दोन रिक्त पदे यामुळे माहिती देण्यास विलंब लागेल, याची कल्पना त्यांना तोंडी दिली होती. श्री.घोलप यांचा अर्ज दि.२१.३.२००७ चा असून शुल्काबाबतचे पत्र दि.२६.४.२००७ रोजी पाठविले. १३१६२ पानांची माहिती तयार करण्यामुळे पाच दिवस विलंब झाला.

नुकसानभरपाईसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे नस्त्या पाठविल्या होत्या. त्यामध्ये झालेल्या फेरफाराची माहिती घेऊन एकत्रित करून ही माहिती द्यावयाची होती. त्यामुळे विलंब झाला. मात्र त्याबाबत अपीलकर्त्यास आधीच कल्पना दिली होती. तसेच संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याचीही तयारी दर्शविली होती, असे जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी विस्तार, पंचायत समिती; आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे डॉ. के.के.कोहिनकर यांनी नमूद केले. जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिपादन रास्त असल्याचे निवेदन विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी(उ.श्रे.), पंचायत समिती; आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे डॉ.के.के.कोहिनकर व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी(उ.श्रे.), पंचायत समिती; आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे डॉ.बी.एस.घंगाळे यांनी केले. तसेच सन २००७ नंतर या माहितीबाबत अपीलकर्त्याने एकदाही पाठपुरावा अथवा अभिलेखाचे अवलोकन केले नाही, असेही त्यांनी नमूद केले.

मागितलेल्या माहितीचे प्रमाण व स्वरूप लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन मान्य करून विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.पंढरीनाथ पिरप्पा घंटे
६१६, उत्तर कसबा,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी,**
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक आरोग्य अधिकारी,**
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६७/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/१२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०/०३/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०/०१/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०/०३/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००० मध्ये उत्तर कसबा, सोलापूर येथे टाकलेल्या ड्रेनेज पाईप लाईन संदर्भातील संपूर्ण माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९/११/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' या अपिलाचा समावेश होता.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' उभयता मध्ये झालेल्या एकमतानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहितीची कागदपत्रे घेऊन जाणेसाठी दिनांक ३/१२/२००८ रोजी अपीलकर्त्यास कळविले व त्यांनी ती माहिती दिनांक ८/१२/२००८ रोजी घेतल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी क्र.१, सोलापूर महानगरपालिका यांनी आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आलम अमिन तांबोळी
रा.आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,
पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कनिष्ठ लिपिक,
नगर परिषद शिक्षण मंडळ,आळंदी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६९+१३७१/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०३.२०१० |
| **३.** | **उपस्थित-** श्री.आलम अमिन तांबोळी<br>रा.आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,<br>पुणे जिल्हा परिषद, पुणे-१<br>श्री.पांढरे एस. तर्फे प्रतिनिधी श्री.भंडारे पी.डी.<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** कनिष्ठ लिपिक,<br>नगर परिषद शिक्षण मंडळ,आळंदी, जि.पुणे श्री.पी.एम.भगत | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.०५.२००७ व दि.०३.०९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - व दि.०३.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.०६.२००७ व दि.१५.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - व दि.२९.१०.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपील क्र.१०६९ मधील माहिती ३६५ दिवसांनंतर मिळाली अपील क्र.१३७१ मधील माहिती विहित मुदतीत मिळाली नाही. तसेच माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरात

'सोबत प्रत जोडलेली आहे' असे नमूद केले असले तरी त्या कागदपत्रांच्या प्रती प्रत्यक्षात मिळाल्या नाहीत. म्हणून जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपिक,नगर परिषद शिक्षण मंडळ,आळंदी, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी,पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.आलम अमिन तांबोळी यांनी केली.

श्री.तांबोळी यांच्या पत्नीला मुख्याध्यापकं म्हणून पदोन्नती न दिल्यामुळे ते सातत्याने विविध स्वरुपाचे अर्ज करीत आले आहेत. श्री.तांबोळी यांचे २२-२३ अर्ज व अपिले आहेत. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. तसेच त्यांच्या पत्नीला पदोन्नती न मिळण्याबाबतची कारणेही स्पष्ट करण्यात आलेली आहेत. अपील मागे घेत असल्याचे त्यांनी लिहूनही दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी कनिष्ठ लिपिक,नगर परिषद शिक्षण मंडळ,आळंदी, जि.पुणे श्री.पी.एम.भगत यांनी केले. 'अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार निर्मुलन समिती'चे आळंदी शाखेचे अध्यक्ष असल्याचे नमूद करुन श्री.तांबोळी सध्याही अर्ज करीत आहेत. परंतु सध्या ते अध्यक्ष नसल्याचे व अन्य अध्यक्षाची निवड झाली असल्याचे वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी श्री.पी.एम.भगत यांनी केले. मात्र अन्य व्यक्तींची निवड झाल्याची लेखी कार्यवाही झालेली नसून आपणाच अध्यक्ष आहोत, असे प्रतिपादन श्री.तांबोळी यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा व प्रशासन अधिकारी श्रीमती उषा पवार प्रथम अपिलाच्या सुनावणीला कोणत्याही तारखेला उपस्थित राहिल्या नाहीत. त्यांच्याविरुध्द योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करण्याबद्दल दि.२९.१०.२००७ च्या पत्रान्वये माध्यमिक शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे यांनी कळविण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.एस.पांढरे तर्फे प्रतिनिधी श्री. पी.डी.भंडारे यांनी नमूद केले. श्रीमती पवार अपिलीय प्राधिकारी यांच्यापुढील सुनावणीस प्रत्येक वेळी गैरहजर होत्या. आयोगापुढील सुनावणीस उपस्थित राहण्यास त्यांना लेखी कळविले होते. तरीही त्या उपस्थित राहिल्या नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

श्री.तांबोळी यांच्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करण्यात आली. आधी मागितलेल्या माहितीतीलच काही मुद्दयांसह नव्या मुद्दयांची माहिती त्यांनी पुन्हा अर्जाद्वारे मागितली. त्यांच्या

तक्रारीच्या अनुषंगाने श्री.तांबोळी व त्यांच्या पत्नी श्रीमती आत्तार बेबीनाजनीन अब्बास यांना कार्यालयात समक्ष बोलावून सर्व माहिती दिली. त्यानंतर त्यांनी अर्ज स्वखुषीने मागे घेत असल्याचे लिहून दिले, असे श्रीमती पवार यांनी आयोगाला सादर केलेल्या दि.२७.११.२००७ रोजीच्या निवेदनात नमूद केले आहे. श्रीमती आतार यांच्या पदोन्नतीच्या संदर्भातील सर्व तपशील त्यांनी निवेदनात नमूद केला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पहाता श्री.तांबोळी एकाच विषयाबाबत विविध स्वरुपात माहिती मागण्याचे अर्ज व अपिले करीत आहेत, असे दिसते. त्या संदर्भात वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आलेली आहे. एखाद्या मुद्याचा फरक करुन तो पुन्हा तोच विषय मांडण्याची त्यांची कृती सर्व यंत्रणांवर अकारण ताण वाढविण्यारी असून हे योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहे.

स्थळ : पुणे
दिनांक : 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. हबीबा गुलाब शेख
अध्यक्ष, हबीबा शिक्षण प्रसारक प्रतिष्ठान,
ई-६६१, सोरेगाव, ता.उत्तर सोलापूर,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
नाथ प्राईड, १ला मजला सिव्हील हॉस्पीटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
हबीबा शिक्षण प्रसारक प्रतिष्ठान,
ई-६६१, सोरेगाव, ता.उत्तर सोलापूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०८/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/०३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १/०४/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०३/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०५/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** हबीबा शिक्षण प्रसारक प्रतिष्ठानच्या मार्च २००५ ते मार्च २००८ अखेर झालेल्या सर्व सभांच्या नोटीसा, इतिवृत्त, ठराव, तसेच प्रत्येक वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालांच्या साक्षांकित प्रती | |

## विवेचन

दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत' या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. हबीबा गुलाब शेख हे अनुपस्थित होते. मूळ अर्जदार श्री. शफिक अब्दुल मस्जिद शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केलेला माहिती - मागणीचा अर्ज व त्यावर जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, हबीबा शिक्षण प्रसारक प्रतिष्ठान यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दि. २२/०५/२००८ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, हबीबा शिक्षण प्रसारक प्रतिष्ठान, सोलापूर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिलेला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे मूळ अर्जदाराने सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) मूळ अर्जदार श्री. शफिक अब्दुल मस्जिद शेख यांच्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेले दि.२२/०५/२००८ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

डॉ. सत्यनारायण भीमाशंकर गायकवाड
गायकवाड हॉस्पीटल, मंगळवार पेठ,
परांडा, जि.उस्मानाबाद

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
नाथ प्राईड, १ ला मजला, सिव्हील हॉस्पीटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बाझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
नर्गिस दत्त मेमोरिअल कॅन्सर हॉस्पीटल, बार्शी,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११११०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/२/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/४/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३/५/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** डॉ चेतन सहस्त्रबुध्दे हे अनधिकृतरित्या भूलतज्ञ म्हणून कार्यरत असताना त्यांच्या कार्यकाळात शस्त्रक्रियांदरम्यान भूलीमुळे झालेल्या मुत्यूसंदर्भात | |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

डॉ. सत्यनारायण भीमाशंकर गायकवाड
गायकवाड हॉस्पीटल, मंगळवार पेठ,
परांडा, जि.उस्मानाबाद

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
नाथ प्राईड, १ ला मजला, सिव्हील हॉस्पीटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बाझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
नर्गिस दत्त मेमोरिअल कॅन्सर हॉस्पीटल, बार्शी,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/२/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/४/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३/५/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** डॉ चेतन सहस्त्रबुध्दे हे अनधिकृतरित्या भूलतज्ञ म्हणून कार्यरत असताना त्यांच्या कार्यकाळात शस्त्रक्रियांदरम्यान भूलीमुळे झालेल्या मुत्यूसंदर्भात | |

**विवेचन**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता डॉ. सत्यनारायण भीमाशंकर गायकवाड यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

२) अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे दि.२७/५/२००८ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शहाजान छोटूलाल शेख
मु.खवणी, पो.पोखरापूर,
ता.मोहोळ, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा धर्मादाय आयुक्त,**
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
अश्विनी रुरल कॅन्सर रिर्सच ॲण्ड रिलीफ सोसायटी संचलित
नर्गिस दत्त मेमोरिअल कॅन्सर हॉस्पीटल, बार्शी,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११२/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/२/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/५/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४/६/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** डॉ. राजेश्वरकर यांच्या अधिपत्याखाली श्री. छोटूलाल महंम्मद शेख यांच्यावर दि.१८/७/२००७ रोजी उपचार करणा-या महिला डॉक्टर बाबतची माहिती | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. शहाजान छोटूलाल शेख यांनी सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

२) अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे दि.२४/२/२००८ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. वैभव धर्मराज पाटील
c/o धर्मराज गणपत पाटील,
सुवर्ण दिप, महूद बु//, ता.सांगोला,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
विभागीय कार्यालय, महावितरण,
पंढरपूर, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
म.रा.वि. मंडळ शाखा सांगोला,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/१२/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६/६/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे खवासपूर, ता.सांगोला येथील गट नं. ७०० या क्षेत्रातील विहिरीवरील मोटारीस विद्युत कनेक्शन मिळणेसंदर्भातील माहिती | |

## विवेचन

दि.१९/११/२००८ च्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता गैरहजर होते.

अपीलकर्त्याची मूळ मागणी ही वीज कनेक्शनबाबतची असून प्रशासकीय कार्यवाहीची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि सदर विहिरीवरील विद्युत पुरवठयाच्या थकबाकीपैकी अपीलकर्त्याच्या हिश्श्याची १/३ रक्कम भरल्यानंतर विद्युत पुरवठा करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण यांनी 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रामध्ये नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अरविंद कृष्ण सिधये ..... **अपीलकर्ता**
फलॅट नं. १०,११, भोसले हेरिटेज ,
गोळीबार मैदान, फलटण, ता.फलटण,
जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमी अभिलेख, ..... उत्तरवादी
तहसील कंपाऊंड, पोवई नाका, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, फलटण, जि.सातारा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३३/२००९/सातारा | |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक | ६.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमी अभिलेख,<br>तहसील कंपाऊंड, पोवई नाका, सातारा प्रतिनिधी श्री.संभाजी जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,<br>भूमी अभिलेख, फलटण, जि.सातारा श्र.एस.बी.कोकणे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | २६.६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | २४.७.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | ७.८.२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | २५.८.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अरविंद कृष्णा सिधये यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले. त्यांनी मागणी केलेल्या मोजणी नकाशात असलेल्या तांत्रिक अडचणीमुळे माहिती देण्यास विलंब लागेल, हे त्यांना कळविले हाते. त्यानुसार माहिती दिली. त्यांनी अपील केल्यानंतर त्यांना अपेक्षित असल्यानुसार पुन्हा माहिती देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, फलटण, जि.सातारा श्र.एस.बी.कोकणे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सत्यम लक्ष्मण जंजिराल
३१०, एकतानगर, वालचंद कॉलेजच्या पाठीमागे,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
नाथ प्राईड, १ला मजला सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष सचिव,**
ज्ञान विकास शिक्षण संस्था,
घर नं डी/२, राघवेंन्द्र एक्सलन्सी, गीता नगर,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९/४/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३/६/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९/७/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ज्ञान विकास संस्थेकडून श्री आंध्र भद्रावती विद्यालयास दिलेल्या रक्कमेचा तपशील | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिलेला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. सत्यम लक्ष्मण जंजिराल यांना आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मूळ अर्जदार श्री. सत्यम लक्ष्मण जंजिराल यांच्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेले दि.९/७/२००८ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रताप किसन वाघ
मु.पो.कोडोली (चंदननगर), ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा धर्मादाय आयुक्त, ३२९, यादोगोपाळ पेठ,
राजधानी टॉवर्स, तिसरा मजला, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, भारत शिक्षण मंडळ,
पी-७२, ॲडीशनल एमआयडीसी, कोडोली, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३८ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रताप किसन वाघ
मु.पो.कोडोली (चंदननगर), ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा धर्मादाय आयुक्त, ३२९, यादोगोपाळ पेठ,
राजधानी टॉवर्स, तिसरा मजला, सातारा प्रतिनिधी श्री.तानाजी गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्षा, भारत शिक्षण मंडळ,
पी-७२, ॲडीशनल एमआयडीसी, कोडोली, सातारा सौ.सुधा दिवाकर भोरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.६.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. निर्णय नाही. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण शाळेत कार्यरत असतानाही सेवेत नसल्याचे नमूद केले. आपण एम.ए.बी.एड. असताना आल्याला डावलून अध्यक्षांचे चिरंजीव श्री.अतुल घोरे यांना ते बी.पी.एड. असतानाही मुख्याध्यापकपदी नेमणूक दिली. आपल्यावर अन्याय केला. विनयभंगाचा गुन्हा आपल्याविरुध्द दाखल केला. श्री.घोरे यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या प्रती दिल्या जात नाहीत. शाळा अनुदानित असूनही माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.प्रताप किसन वाघ यांनी केली.

श्री.वाघ यांनी सन १९९३ ते २००९ या काळातील माहिती मागितली होती. मुख्याध्यापकांच्या संदर्भात माहिती त्रयस्थ पक्षाची असून ही माहिती देऊ नये, असा आक्षेप त्यांनी नोंदविल्यामुळे ती माहिती श्री.वाघ यांना दिली नाही. सन २००० पर्यंत शाळा विनाअनुदानित होती. त्यामुळे तत्पूर्वीची कागदपत्रे नाश केलेली आहेत. वीस शिक्षकांच्या नियुक्तीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता व नियमानुसार सर्व कार्यवाही करण्यात आली आहे. रोस्टर लागू होण्याआधी भरती केलेली नाही. रोस्टर लागू झाल्यावरच भरती केली असून सन २००५ मध्ये श्री.वाघ यांना संस्थेच्या सेवेत घेण्यात आले आहे. 'तक्रार करणार नाही' असे लिहून देऊनही खोटेनाटे आरोप करून ते संस्थेला त्रास देत आहेत. वीस शिक्षकांच्या प्रस्तावाबाबतची माहिती मूळ अर्जानुसार त्यांनी मागितली नसली तरी टपालाने आठ दिवसांत पाठविली जाईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्षा, भारत शिक्षण मंडळ, पी-७२, ॲडीशनल एमआयडीसी, कोडोली, सातारा सौ.सुधा दिवाकर घोरे यांनी केले.

तत्कालीन व्यवस्थेनुसार अपीलकर्त्याने संस्थेच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील करणे आवश्यक होते. त्यांनी धर्मादाय आयुक्त, सातारा विभाग, सातारा यांच्याकडे अपील केले. आपण या विषयात अपिलीय प्राधिकारी नसल्याचे त्यांना वेळीच कळविले, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा धर्मादाय आयुक्त, सातारा विभाग, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.तानाजी गायकवाड यांनी केले.

शाळा अनुदानित झाल्यानंतरच्या काळातील सन २००० नंतरची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. नेमणुकातील अन्याय, इत्यादीबाबतच्या अपीलकर्त्याच्या तक्रारी हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) वीस शिक्षकांच्या नियुक्तीबाबतचे संस्थेने पाठविलेल्या प्रस्तावाच्या प्रती व मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा अध्यक्षा, भारत शिक्षण मंडळ, पी-७२, ॲडिशनल एमआयडीसी, कोडोली, सातारा यांनी अपीलकर्त्यास आठ दिवसांत निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अध्यक्षा, भारत शिक्षण मंडळ, पी-७२, ॲडिशनल एमआयडीसी, कोडोली, सातारा सौ.सुधा दिवाकर भोरे यांनी आयोगाला त्वरित सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010